क्रमांकपोअलोना/पशा–4/गॅझेट/ /22
पोलीस अधिक्षक कार्यालय, लोहमार्ग, वंजारी नगर,
पाण्याच्या टाकी जवळ, अजनी, नागपूर 440027
☏:0712–43984-mail
sp.railways.nagpur@mahapolice.gov.in
दिनांक :

| | | |
|---|---|---|
| पोलीस पत्रिका<br>क्रमांक 04 | पोलिस अधिक्षक<br>लोहमार्ग नागपूर | दिनांक : 24/01/2022<br>28/01/2022 |

---

भाग– 1
( नियुक्ती,बदली,पदोन्नत्ती,सेवा निवृत्ती ½

क्रमांक :– पोअलोना/आस्था/आ.जि.ब./कार्यमुक्त/553/2022 नागपूर दिनांक 24 जानेवारी 2022

पोलीस अधिक्षक चंद्रपुर यांनी त्यांचे पत्र क. पोअसं/एस बी–1/आंजिब–पो. अंमलदार–स्विकृती/2021 दिनांक 30 डिसेंबर 2021 अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/1017/3843/प्र.क्र.469/पोल–5 ब दिनांक 26/10/2017 मधील विहीत केलेल्या अटी व खालील नमुद अटी अधिन राहुन सद्यःस्थितीत पोलीस शिपाई संवर्गात प्रवर्ग निहाय रिक्त असलेले पदात पोलीस अधिक्षक चंद्रपुर यांचे आस्थापनेवर आंतर जिल्हा बदलीवर आस्थापना मंडळाच्या मान्यतेने स्विकृती दिली असल्याने व नमुद पोलीस अंमलदार यांनी पोलीस शिपाई या पदावर जाण्याकरीता बंधपत्र दिले असल्याने त्यांना लोहमार्ग पोलीस जिल्हा नागपूर यांचे आस्थापनेवरून पोलीस अधिक्षक चंद्रपुर यांचे आस्थानेवर हजर होण्याकरीता दिनांक 31/01/2022 चे माध्यमानंतर पासुन कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | यादी मधील क्रमांक | पदनाम | ब.न. | अंमलदाराचे नाव | या घटकातील नेमणुक | स्विकृतीचे पद | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 06 | पोशि | 354 | मनोज रामकृष्ण नन्नावरे | रे.पो.स्टे. अकोला | पोलीस शिपाई | अनु. जमाती |

---

कामांक :– पोअलोना/पशा–5/नेमणुक/फा.क्र.6/484/2022 नागपूर दिनांक 26 जानेवारी 2022

आदेश

पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेश क्र. पोमसं/5/10 अर्हता–2013 (पदोन्नती–2021)/55/2021 दिनांक 03 नोव्हेंबर 2021 अन्वये सहायक फौजदार श्री चंद्रकांत रामदास निकम व श्री सलीम एफ काझी यांची स्थानापन्ना कोटयातील निःशस्त्र पोलीस उपनिरीचे पदावर पदोन्नतीने पोलीस आयुक्त नाशिक शहर यांचे आस्थापनेवरून लोहमार्ग पोलीस नागपूर यांचे आसथापनेवर पदस्थापना करण्यात आली आहे.

श्री चंद्रकांत रामदास निकम व श्री सलीम एफ काझी हे पोलीस हवालदार ते पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्तीने या जिल्हयात दिनांक 10/01/2022 रोजी हजर झाले असुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रामणे लोहमार्ग पोलीस ठाण्यामध्ये त्यांची दुय्यम अधिकारी म्हणुन प्रथम नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हुददा | या जिल्हयात हजर झाल्याची दिनांक | प्रथम नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री चंद्रकांत रामदास निकम | पोलीस उपनिरीक्षक | दि. 10/01/2022 | लोहमार्ग पोलीस ठाणे गोंदीया |
| 2 | श्री सलीम एफ. काझी | पोलीस उपनिरीक्षक | दि. 10/01/2022 | लोहमार्ग पोलीस ठाणे वर्धा |

---

क्रमांक :– पोअलोना/पशा–1/अर्जीत रजा/फुटाणे/2022–496 नागपूर दिनांक 27/1/2022

आदेश

श्री राजेश कैलास फुटाणे कनिष्ठ श्रेणी लिपीक पगार लिपीक–1 यशंची म.ना.से.रजा नियम 1981 मधील 50 अन्वये दिनांक 25/01/2022 ते 22/02/2022 पर्यंत एकुण 29 दिवस अर्जीत रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह माहे जानेवारी व फेब्रुवारी/2022 या महिण्याचे पगार विहीत मुदतीत कोषागारात दाखल तथा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे सन 2021–2022 या वित्तीय वर्षाचे आयकर गणना वेळेवर होईल या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

त्यांचे रजेच्या कालावधीत श्रीमती सविता चंदेल वरिष्ठ श्रेणी लिपीक पगार –1 यांचे कडे अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे.

---

क्रमांक :– पोअलोना/आस्था–1/बालसंगोपन रजा/516/2022 नागपूर दिनांक 28/01/2022

आदेश

खालीन नमुद पोलीस कर्मचारी यांना शासन निर्णय क्र. संकीर्ण/2017/प्र./25/सेवा.6 मंत्रालय मुंबई दिनांक 23/07/2018 मध्ये नमुद तरतुदीनुसार त्यांच्या नावासमोर नमुद केल्याप्रमाणे रजेवर सुटल्याच्या दिनांकापासुन सन 2022 यास कॅलेंडर वर्षाकरीता बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव/ब.न./हुद्या | नेमणुक | मंजुर करण्यात आलेली बालसंगोपन रजा |
|---|---|---|---|
| 1 | मपोहवा/784 राखी मेश्राम | मुख्यालय | 60 दिवस |
| 2 | म्पोशि/415 पुनम साबळे | रे.पो.स्टे. नागपूर | 30 दिवस |
| 3 | मपोशि/735 प्रणाली चातरकर | रे.पो.स्टे. नागपूर | 30 दिवस |
| 4 | मपोशि/800 ज्योती भिवगडे | रे.पो.स्टे. नागपूर | 30 दिवस |
| 5 | मपोशि/72 प्रिती साळवे | मसावि | 30 दिवस |
| 6 | मपोशि/92 रेश्मा धोटे | रे.पो.स्टे. इतवारी | 60 दिवस |
| 7 | मपोशि/283 वैशाली सोनकुसरे | मुख्यालय | 30 दिवस |
| 8 | पोशि/300 विराज मते | मुख्यालय | 60 दिवस |
| 9 | मपोना/960 सुनिता चौधरी | रे.पो.स्टे बडनेरा | 60 दिवस |

क्रमांक :– पोअलोना/आस्था/प्रतिनीयुक्ती/412/2022 नागपूर दिनांक 21 जानेवारी 2022

आदेश

आयुक्त राज्य गुप्तवार्ता विभाग महाराष्ट्र राज्स मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. रागुवि/आस्था–3/प्र.नि–सगुअ व गु.अ./4824/2021 दिनांक 23 सप्टेंबर 2021 अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांची आयुक्त राज्य गुप्तवार्ता विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे अधिपत्याखालील केंद्रामध्ये रिक्त असलेल्या गुप्तवार्ता अधिकारी या पदावर तात्पुरत्या स्वरूपात एक टप्पा पदोन्नतीवर प्रतिनीयुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

| अ.क्र. | हुददा व ब.न. | नाव |
|---|---|---|
| 1 | पोहवा/430 | सतीश प्रेमलाल करमरकर |
| 2 | पोहवा/153 | अनिल उमाकांत पुरी |

उपरोक्त नमुद दोंन्ही पोलीस अंमलदार यांना दिनांक 22 जानेवारी 2022 चे मध्यानानंतर पासुन या जिल्हयाचे आस्थापनेवरून प्रतिनीयुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता कार्यमुक्त करण्यात येत आहे.

---

अंतिम आदेश

क्रमांक :– पोअलोना/विचौ/कसुर–नक्षल.बंदो/रे.पो.स्टे.ईतवारी/गैरहजर/498/2022 नागपूर दि. 24/1/2022

अपचारीचे नांव व पदनाम :– 1) मपोशि/735 प्रणाली चातरकर 2) मपोशि/1012 श्रध्दा मिश्रा 3) पोशि/213 दिपक सेलोटे 4) पोशि/373 सुदामा सोलंकी
सर्व नेमणुक रे.पो.स्टे. नागपूर

वाचा :– 1) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोअलोना/वि.चौ/कसुरी–नक्षल बंदा/रेपोस्टे इतवारी/6276/2021 दिनांक 11/10/2021

2) मपोशि/735 प्रणाली चातरकर यांचे क्र. 3254/21 दि. 18/10/2021 मपोशि/1012 श्रध्दा मिश्रा यांचे जा.क्र. 3243/21 दिनांक 18/10/2021 व पोशि/213 दिपक सेलोटे यांचा जा.क्र. 3305/21 दि. 21/10/2021 पोशि/373 सुदामा सोलंकी यांचा जा.क्र. 3304/21 दिनांक 21/10/21 रोजी सादर केलेले स्पष्टीकरण

संक्षिप्त कसुरी :– आपण, लोहमार्ग पोलीस ठाणे, नागपूर येथे नेमणुकीस असुन रेल्वे स्टेयान नागभिड येथे दिनांक 27/7/2021 ते 04/08/2021 पावेतो सीपीआय माओवादी संघटनेकडुन नक्षल सप्ताह असल्याने आपली बंदोबस्त कामी डयुटी लावण्यात आलेली होती. आपणास पोलीस मुख्यालय लोहमार्ग नागपूर येथुन दि. 27.7.2021 रोजी सकाळी 08.00 वाजण्याचे सुमारास नक्षल बंदोबस्त कामी सोग्यती सुचना देवुन प्रत्येकी आपणास एक एसएलआर रायफल/राउंड देवुन सराकारी वाहन क्रमांक एम.एच.31/डीजे–0068 या वाहनाने रेल्वे स्टेशन नागभिड या ठिकाणी जाण्याकरीता सोय करण्यात आली होती. आपण नक्षलवादी याहिद सप्ताह असा अत्यंत महत्वाचा बंदोबस्त असुन व पोलीस अंमलदार या पदाच्या जबाबदारीचे भान न ठेवता आपल्या ताब्यातील आर्म–ॲम्युनेशन असुन सुध्दा आपण आपले कर्तव्यावर अनाधिकृतपणे गैरहजर राहुन दिनांक 28.07.2021 रोजी रेल्वे स्टेशन नागभिड येथे हजर झालेले आहात.

आपण शासकीय कामाचा शिष्टाचार सोडुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तनुक) नियम 1979 मधील नियम 3 अन्वये सचोटी कर्तव्यतत्परता इत्यादी राखण्याबाबतचे शासकीय कर्मचा–यांचे कर्तव्य असुन शासकीय कर्मचा–याला न शोभेल अशी कोणतीही कृती करता कामा नये अये नमुद आहे. आपण पोलीस अंमलदार या जबाबदारीच्या पदावर कार्यरत असुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम 1979 मधील नियम 3 मधील तरतुदीचे पानत्रलम केलेले नसल्याचे निष्पन्न होत असुन आपण कारवाईस पात्र ठरला आहात आहात आपले वरील कृत्य पोलीस खात्याचे शिस्तीला न शोभणारे असुन खात्याचे शिस्तीचे उल्लंघन करणारे आहे.

वरील कसुरी बाबात आपणास या कार्यालयाचे संदर्भाकीत क्रमांक –1 चे आदेशान्वये मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम 1956 मधील नियम 3 (2) अन्वये आपणा आपल्या मळ वेतनाच्या 10 टक्के कपात करण्याची आर्थिक दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आले होती. सदर कारणे दाखवा नोटीसवर संदर्भाकीत पत्र क्रमांक –2 अन्वये आपण स्पस्ष्टीकरण सादर केल आहे. आपण सादर केलेले स्पष्टीकरणात मपोशि/735 प्रणाली चातरकर हि प्रभारी अधिकारी रे.पो.स्टे इतवारी यांना भेटुन एक दिवस उशिरा जाण्याची परवानगी मागितली होती परंतु त्यांना आपणास जवळ असलेले रायफल्य व राउंड असल्याने परवानगी नाकारली होती. तसेच नक्षल बंदोबस्त मधील पोउपनि श्री राजेश वरठे यांची सुध्दा आपणास परवानगी नाकारली होती असे प्रभारी अधिकारी यांचे कडील दिनांक 03.10.2021 अन्वये पत्र सादर केलेल आहे. आपण सादर केलेल्या स्पष्टीकरणाचर सहानुभुतीपुर्वक विचार करून तथा सदरहु प्रकरणी सांगोपांग विचार करता आपणास प्रस्तावित केलेल्या शिक्षेत अंशतः बदल करून सक्षम अधिकारी म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

1) मपोशि/735 प्रणाली चातरकर 2) मपोशि/1012 श्रध्दा मिश्रा 3) पोशि/213 दिपक सेलोटे 4) पोशि/373 सुदामा सालंकी सर्व नेमणुक रे.पो.स्टे नागपुर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम 1956 मधील नियम 3(2) अन्वये सक्षम प्राधिकारी या नात्याने दिलेल्या अधिकाराचा वापर करून आपण केलेल्या कसुरीह बददल आपणास प्रत्येकी रू 2000/– (अक्षरी दोन हजार रूपये फक्त) आर्थीक दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.

1) मपोशि/735 प्रणाली चातरकर 2) मपोशि/1012 श्रध्दा मिश्रा 3) पोशि/213 दिपक सेलोटे 4) पोशि/373 सुदामा सालंकी सर्व नेमणुक रे.पो.स्टे नागपुर हे या आदेशामुळे व्यथित होत असल्यास ते हा आदेश प्राप्त तारखेपासुन 60 दिवसाचेआत अपर पोलीस महासंचालक लोहमार्ग म.रा. मुंबई यांना (दोन प्रतित अपिल अर्ज सादर करू शकतात)

---

अंतिम आदेश

क्रमांक :– पोअलोना/वि.चौ/कसुरी–नक्षल बंदो/रेपो.स्टे.इतवारी/गैरहजर/497/2022 नागपूर दि. 27/11/22

अपचारीचे नांव व पदनराम :– महिला पोलीस नायक/610 रिता राजाराम राऊत नेमणुक रेपोस्टे नागपूर

वाचा :– 1) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोअलोना/वि.चौ/कसुरी–नक्षल बंदो/रे.पो.स्टे इतवारी/6277/2021 दिनांक 11.10.2021

3) आपण जा.क्रमांक 3287/2021 दिनांक 20.10.2021 रोजीची सादर कलेले स्पष्टीकरण.

संक्षिप्त कसुरी :– आपण लोहमार्ग पोलीस ठाणेनागपूर येथे नेमणकीस असुन रेल्वे स्टेशन नागभिड येथे दिनांक 27.7.2021 ते 4.08.2021 पावेतो सीपीआय माओवादी संघटनेमडुन पक्षल सप्ताह असल्याने आपली बंदोबस्त कामी डयुटी लावण्यात आलेली होती आपणास पोलीय मुख्यालय लोहमार्ग नागपूर येथुन दि. 27.7.2021 रोजी सकाळी 08. 00 वाजण्याचे सुमारास नक्षल बंदाबस्ता कामी योग्यती सुचना देवुन आणास एक एसएलआर रायफल/राउंड देवुन सरकारी वाहन क्र. एम. एच .31 ढरजे. 0068 या वाहनाने रेल्वे स्टेशन नागभिड या ठिकाणी जाण्याकरीता सोय करयात आली होती आपण नक्षलवादी याहिद सप्ताह असा अत्यंत महत्वाचा बंदोबस्त असुन व पोलीस अंमलदार या पदाच्या जबाबदारीचे भान न ठेवता आपल्या ताब्यातील आर्म–ॲम्सुनेशन असुप सुध्दा आपण आपले कर्तव्यावर अनाधिकृतपणे गैरहजर राहुन दिनांक 28.7.2021 रोजी रेल्वे स्टेशन नागभिड येथे हजर झालेले आहात.

2) महिला पोलीस अंमलदार व पुरूष पोलीस अंमलदार यांची रेल्वे स्टेशन नागभिड येथील परिस्थीतच्या प्रमाणे राहण्याची सोय करण्यात आली होती. परंतु आपण केलेल्या राहण्याच्या सोयी नुसार राहण्यास नकार देवुन

वातानुकूलीन प्रवासी प्रतिक्षालय या ठिकाणी राहण्याची सोय करावी या करिता येथील रेल्वे अधिकारी व कर्मचारी यांचे शी हुज्जतबाजी करून आरेरावीची भाषा वापरून विभागीय नक्षल बंदोबस्त प्रभारी अधिकारी उपविभागीय पोलीसअधिकारी लोहमार्ग नागपूर विभाग व नक्षल बंदोबस्त दुय्यम अधिकारी यांना कोणतिही माहिती न देता परस्पर नियंत्रण कक्ष लोहमार्ग नागपूर व स्थानिक पत्रकारांना ऩाल बंदोबस्त मध्ये महिलाची गैरसोय होत आहे अशी खोटी बातमी प्रसार करण्याचा प्रयत्न करून पोलीस खात्याची प्रमिता मलीन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आपण विहीत मार्गाचा अवलंब न करता शासकीय कामाचा शिष्टाचार सोडुन महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1979 मधील नियम 3 अन्वये सचोटी कर्तव्यतत्परता ईत्यादी राखण्याबाबतचे शासकीय कर्मचा–यांचे कर्तव्य असुन शासकीय र्कचा–याला न शोभेलअशी कोणतिही कृती करता कामा नये असे नमुद आहे. आपण पोलीस अंमलदार आपण पोलीस अंमलदार या जबाबदारीच्या पदावर कार्यरत असुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम 1979 मधील नियम 3 मधील तरतुदीचे पानत्रलम केलेले नसल्याचे निष्पन्न होत असुन आपण कारवाईस पात्र ठरला आहात आहात आपले वरील कृत्य पोलीस खात्याचे शिस्तीला न शोभणारे असुन खात्याचे शिस्तीचे उल्लंघन करणारे आहे.

वरील कसुरी बाबात आपणास या कार्यालयाचे संदर्भाकीत क्रमांक –1 चे आदेशान्वये मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम 1956 मधील नियम 3 (2) अन्वये आपणा आपल्या मळ वेतनाच्या 10 टक्के कपात करण्याची आर्थिक दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आले होती. सदर कारणे दाखवा नोटीसवर संदर्भाकीत पत्र क्रमांक –2 अन्वये आपण स्पस्ष्टीकरण सादर केल आहे. आपण सादर केलेले स्पष्टीकरणात मपोशि/735 प्रणाली चातरकर हि प्रभारी अधिकारी रे.पो.स्टे इतवारी यांना भेटुन एक दिवस उशिरा जाण्याची परवानगी मागितली होती परंतु त्यांना आपणास जवळ असलेले रायफल्य व राउंड असल्याने परवानगी नाकारली होती. तसेच नक्षल बंदोबस्त मधील पोउपनि श्री राजेश वरठे यांची सुध्दा आपणास परवानगी नाकारली होती असे प्रभारी अधिकारी यांचे कडील दिनांक 03.10.2021 अन्वये पत्र सादर केलेल आहे. आपण सादर केलेल्या स्पष्टीकरणाचर सहानुभुतीपुर्वक विचार करून तथा सदरहु प्रकरणी सांगोपांग विचार करता आपणास प्रस्तावित केलेल्या शिक्षेत अंशंताः बदल करून सक्षम अधिकारी म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

महिला पोलीस नायक/610 रिता राऊत नेमणुक रेपोस्टे नागपूर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम 1956 मधील नियम 3(2) अन्वये सक्षम प्राधिकारी या नात्याने दिलेल्या अधिकाराचा वापर करून आपण केलेल्या कसुरीह बददल आपणास प्रत्येकी रू 2000/– (अक्षरी दोन हजार रूपये फक्त) आर्थीक दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.

महिला पोलीस नायक/610 रिता राऊत नेमणुक रेपोस्टे नागपूर हे या आदेशामुळे व्यथित होत असल्यास ते हा आदेश प्राप्त तारखेपासुन 60 दिवसाचेआत अपर पोलीस महासंचालक लोहमार्ग म.रा. मुंबई यांना (दोन प्रतित अपिल अर्ज सादर करू शकतात)

क्रमांक :– पोअलोना/आस्था–1/बालसंगोपन रजा/519/2022 नागपूर दिनांक 28/01/2022

आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन गृह विभाग म. रा. मुंबई शासन निर्णय क्रमांक एलव्हिआय/2003/प्र.क्र.564/पोल–5/ब दिनांक 10/04/2007 अन्पसे म.ना.से. (रजा) 1981 मधील नियम क्र. 50 मधील तरतुदीनुसार सन 2021–2022 या वर्षाकरीता अर्जीत/समर्पीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्म चे नांव/हुद्या/ब.न | नेमणुक | रजेचे कारण | अर्जीत रजा | समर्पीत रजा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पोशि/1172 विकास तायडे | मुख्यालय | घर बांधकामाकरीता | 30 | 15 |
| 2 | पोहवा/517 अतर राठोड | अकोला | धार्मीक कार्याकरीता | 15 | ––– |
| 3 | पोशि/1122 राकेश वासनिक | वर्धा | पत्नीचे औषधोपचाराकरीता | 30 | ––– |
| 4 | पोहवा/761 नामदेव सहारे | स्थागुशा | भाचीचे लग्नाकरीता | 15 | ––– |

---

क्रमांक :– आर/23/बक्षिस/530/2022 नागपूर दिनांक 28/1/2022

आदेश

पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे माहितीचा अधिकार कक्ष लोहमार्ग नागपूर येथे आपले कामा व्यतिरीक्त कामकाज करीत असुन दि. 01.01.2021 ते 31.12.2021 या कालावधीत माहिती अधिकार अधिनीयम 2005 अन्वये एकुण 33 अर्जाचे निपटारा करण्यात आले असुन अर्जदार यांचेकडुन माहिती छायांकीत प्रतीचे 2/– रूपये प्रमाणे शुल्क आकारून एकुण 8420/– रूपये कार्यालय पोलीस अधिक्षक, लोहमार्ग नागपूर यांचेकडे जमा केले. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप–अधिक्षक (मुख्या) लोहमार्ग नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली स्तंभ क्र. 02 मधील अनं.क्र. 01 पोलीस अधिकारी व अनु क्र. 02 पोलीस अंमलदार यांनी आपले कामा व्यतिरीक्त कामकाज करून माहिती अधिकार अधिनीयम 2005 कायद्यान्वये उत्तमरित्या कारवाई केली. करीता नमुद पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या उत्कुष्ठ कामगिरी बददल प्रोत्साहानार्थ खालील प्रमाणे बक्षिस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधि./अंमलदारांची नावे/हुददा/ब.न. | नेमणुक | बक्षिस |
|---|---|---|---|
| 1 | पोनि/श्री वासुदेव डाबरे | जि.वी.शा.लोहमार्ग नागपूर | रू 500/– व सी नोट |
| 2 | पोहवा/153 पुरी | जि.वी.शा.लोहमार्ग नागपूर | रू 300/– व जीएसटी |

क्रमांक :– आर / 23 / बक्षिस / 529 / 2022 नागपूर दिनांक 28 / 1 / 2022

आदेश

दिनांक 08 / 11 / 2021 रोजी नमुद पोलीस अंमलदार यांची रे.पो.चौकी बल्लारशाह येथे डयुटी असतानां डयुटी दरम्यान प्लॅटफार्म नं. 1 वर लावारीस स्थितीत एक लेडीज बॅग मिळुन आल्याने ती बॅग चोकीला आणुन आतील सामानाची तपासणी केली असता त्या बॅग मध्ये सोन्याचे मंगळसुत्र एम. आय. कंपनीचा मोबाईल रोख 1000 / –रू असा माल मिळुन आल्याने बॅगधारक यांना फोनद्वारे संपर्क साधून त्यांना चोकीत अत्रबोलावुन नमुद माल त्यांच्या ताब्यात देण्यात आले वरून मा. पोलीस अधिक्षक सो. यांनी दि. 16.11.2021 रोजी घेतलेले वार्षिक निरीक्षण व शिट रिमार्कच्या वेळी नमुद केलेल्या हकीकत वरून नमुद पोलीस अंमलदार यांच्या उत्कुष्ठ कामगिरी बददल प्रोत्साहानार्थ खालील प्रमाणे बक्षिस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदारांची नावे / हुदद / ब.न. | नेमणुक | बक्षिस |
|---|---|---|---|
| 1 | सपोनि / श्री सरवदे | रे.पो.स्टे. वर्धा | रू 1000 / – व सीनोट |
| 2 | पोहवा / 214 नेवारे | रे.पो.स्टे. वर्धा | रू 1000 / – व जीएसटी |

( एम.राज कुमार )
पोलीस अधिक्षक,लोहमार्ग,
नागपुर

प्रति,

ठाणेदार, सर्व नागपूर लोहमार्ग, जिल्हा

प्रत माहीतीसः– अपर पोलीस अधिक्षक लोहमार्ग नागपूर / सर्व उपविभागिय पोलीस अधिकार लोहमार्ग नागपूर / मनमाड / जालना
प्रभारी अधिकारी :– स्था.गु.शा. नागपूर / भुसावळ / वाचकशाखा / जि.व्ही.शाखा / पो.नी कक्ष, राखीव पालीस निरीक्षक पोलीस मुख्यालय / मोटार परिवहन विभाग श्वॅान पथक / बी.डी.डी. एस. / कार्यालय अधिक्षकपत्र व्यवहार शाखा / लेखा शाखा / आस्थापना शाखा / पत्रव्यवहार लीपीक–1,5 / बि.सं. विभाग कार्यालय पोलीस अधिक्षक,लोहमार्ग नागपूर

पोलिस अधिक्षक लोहमार्ग नागपूर

पोलिस पत्रिका क्रमांक 04

दिनांक 24/01/2022 ते 28/01/2022